# आकार आणि सौंदर्य

निसर्गातील ज्या विविध गोष्टी आहेत जसे डोंगर, पर्वतरांगा, नदी, झाडे, पाने फुले इ. ज्यामुळे निसर्गास सौंदर्य प्राप्त होते, त्या प्रत्येक गोष्टीस एक विशिष्ट आकार आहे. निसर्गातील ह्या नैसर्गिक गोष्टींना, त्यांच्या विशिष्ट आकारामुळे सौंदर्य प्राप्त होते.

हिमालयाच्या पर्वतरांगांचे सौंदर्य काश्मिरमधील वेगळे, हिमाचल प्रदेशातील वेगळे, लेह व लडाखमधील वेगळे, उत्तरखंडातील वेगळे आणि नेपाळ, बलुचिस्तान, पाकिस्तानातील वेगळे. दक्षिणेकडील निलगिरी पर्वतराईंचे आणि सह्याद्रीचे सौंदर्य वेगळे ह्याला कारण त्या पर्वतरांगांचा विशिष्ट आकार.

निसर्गातील झाडे पहा. सुचिपर्णी वृक्ष असो वा डेरेदार वाढलेला आम्रवृक्ष, वाऱ्यासोबत पानांची सळसळ करणारा पिंपळ वृक्ष, आपल्याच पारंब्या जमिनीत रुजवत फोफावणारा वट वृक्ष असो वा पळसाचे झाड असो, प्रत्येकाला त्याच्या विशिष्ट आकाराने सौंदर्य प्राप्त झाले आहे.

त्या झाडांच्या पानाचा आकार पहा, पिंपळ पानाचा नक्षीदार आकार, आंब्याच्या पानांचा लांबट आकार, पळसाच्या पानाचा मोठा आकार आणि अळवाच्या पानाचा विस्तीर्ण आकार हा त्या पानास एक सौंदर्य प्राप्त करतो.

आकार आणि सौंदर्य ह्याचा निकटचा संबंध आहे. ओबडधोबड आकाराची वस्तू सहसा नजरेस भरत नाही. त्याउलट विशिष्ट प्रमाणबद्ध आणि सुबक आकाराची वस्तू सहज डोळ्यात भरते.

प्राणी आणि पक्षी पहा ना, वक्राकार सोंडेचा आणि शूर्पकर्ण असलेल्या गजराजाचे सौंदर्य काही वेगळेच आणि दाट आयाळ असलेल्या सिंहाचे सौंदर्य वेगळे. घोड्याचा बांधेसूद आकार, मोराच्या मोरपिसाचे आणि पिसाऱ्याचे सौंदर्य काही वेगळेच तर आकाशात विहार करणाऱ्या गरुडाच्या पंखांच्या आकाराचे सौंदर्य काही वेगळेच.

तसे भौमितिक दृष्ट्या अनेक आकार आहेत, जसे त्रिकोण, चौकोन, आयत, पंचकोन, षट्कोन, अष्टकोन, वर्तुळ इ. त्यातील वर्तुळ आणि अंडाकृती आकार जास्त मनात भरणारे कारण त्या आकारास एक सहजता आहे. सरळरेषेपेक्षा वळणदार रेषा जास्त छान दिसते कदाचित त्यामुळे सरळ रस्त्यापेक्षा नागमोडी आणि वळणा वळणाचा रस्ता जास्त आकर्षक दिसतो. इतका आकार आणि

सौंदर्याचा घनिष्ट संबंध आहे.

माणसाचे खरे सौंदर्य म्हणजे त्याचा चेहरा. माणसाच्या चेहेऱ्याचा एक विशिष्ट आकार आहे, त्याला सममिती म्हणजेच symmetry आहे. सममिती, symmetry त्या वस्तूला एक वेगळेच सौंदर्य बहाल करते. माणसाचा चेहराच घ्या ना. दोन डोळे, दोन कान, नाक, कपाळ ओठ, जिवणी इतके साचेबद्ध आणि सममिती आहे की त्यामुळे चेहऱ्यास एक सौंदर्य प्राप्त होते. चेहऱ्यातील समरूपता आणि आकारबद्धपणा ह्यामुळे माणसाच्या चेहऱ्यास सौंदर्य प्राप्त होते. शरीराचे इतर अवयव जसे हात, पाय, छाती, खांदे ह्यातील बांधेसूदपणा आणि सममिती,शरीरास सौंदर्य प्राप्त करून देतो.

भूमिती, Geometry ह्याचा आकारामानाशी खूप जवळचा संबंध. Geometry मधील तंतोतंतपणा, preciseness हा आणखी वेगळा विषय. जणू त्या आकारमानाची आणि preciseness ची तुलना जणू काव्याशी केली आहे.

'Poetry is as precise thing as Geometry.'

हे विविध आणि विशिष्ट आकार जसे त्या वस्तूला सौंदर्य बहाल करतात तसेच आकारबद्ध जीवन आणि प्रत्येक गोष्टीस उत्तम आकार देण्याचा प्रयत्न केल्यास त्या त्या गोष्टीस सौंदर्य प्राप्त होते.

माणूस बोलतो, संवाद साधतो त्यावेळी त्याच्या बोलण्यात असलेला मृदूपणा, बोलण्यातला एक लयबद्धपणा, प्रेमळ आणि लाघवी स्वर व शांत एका लयीत बोलणे इ. गोष्टींमुळे त्या बोलण्याला एक विशिष्ट आकार प्राप्त होतो. त्यामुळे बोलणे गोड, परिणामकारक ठरते कारण त्यास एक सौंदर्य प्राप्त झालेले असते. उत्तम वक्ता श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतो ज्यावेळी त्याच्या बोलल्यात एक लयबद्धता असते आणि शब्दांना एक साचेबद्ध आकार आलेला असतो.

गायक गाताना ज्या ताना आणि हरकती घेत असतो त्यावेळी त्याच्या सुरांची ताल, लयीशी समरूपता असते त्यामुळे त्यास एक आकार आणि सौंदर्य प्राप्त होते.

नृत्य हा जणू एक लयबद्ध आकारच, त्या नृत्याचा असलेला गाभा म्हणजे शरीराची लयबद्ध हालचाल आणि त्या हालचालींचा ताल व लयीशी असलेला सुंदर मेळ, ज्यामुळे त्या नृत्यास एक सौंदर्य आणि नजाकत प्राप्त होते.

'The ballet makes to see the rhythmic movements of those bodies, it makes us to

listen to that music, it makes us at that Geometry and the way it comes together which gives extraordinary beauty and emotional force.'

चंद्र हा जणू सौंदर्याचा मापदंडच. किती कवींना ह्या चंद्राच्या आकाराने वेड लावले असेल! चतुर्थीच्या चंद्रकोरीचे एक वेगळेच सौंदर्य आहे.
'चौदहवीका चांद' हा जसा सौंदर्याचा मापदंड तसाच पौर्णिमेच्या चंद्राचे सौंदर्य वेगळेच.
'ये चांदसा रोशन चेहरा' असे म्हणत कवींनी चेहऱ्याला चंद्राची उपमा दिली ह्याचे कारण चंद्राचा आकार.

ह्या आकार आणि सौंदर्याच्या असलेल्या घनिष्ट संबंधाचा विचार केल्यास, माणसाने त्याच्या शरीरास जर अंग मेहनतीने आणि व्यायामाने, योगासनाने उत्तम आकार दिला तर त्याला एक वेगळे सौंदर्य प्राप्त होते. सुडौल बांधा आणि सुडौल शरीर एक वेगळेच सौंदर्य देते.

शारिरीक सौंदर्यासोबत माणसाने त्याच्या मनाला आणि मनातील विचारांना जर छानसा आकार दिला तर, म्हणजे मनात सकारात्मक विचारांची पेरणी, प्रेरणात्मक विचार ज्यामुळे मनास एक आकार प्राप्त होतो. मोठी स्वप्ने पाहत असताना त्यास परिश्रमाची आणि चिकाटीची जोड देऊन त्याला 'स' आकार देत ती 'साकारणे' ह्यामुळे व्यक्तिमत्वास एक आकार प्राप्त होतो.

चांगला स्वभाव, उत्तम विचारसरणी, मृदू आणि लयबद्ध भाषा आणि सुस्पष्ट विचारसरणी त्याला मिळालेली परिश्रम आणि चिकटीची साथ व्यक्तिमत्व 'साकारण्यासाठी' मदत करतात ज्यामुळे त्या व्यक्तीस एक वेगळेच सौंदर्य प्राप्त होते.

**मनोज कुरुंभटी**